Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18844792

# डिजिटल सोसायटी आणि रिलेशनशिप – एक सामाजिक अभ्यास

प्रा. दौलत मंचरे[1]

**प्रस्तावना:**

पृथ्वीवर मानवी समाजाची निर्मिती झाली.'परंतु त्यात अनेक प्रकारचे बदल, रचना सुद्धा झाली त्या बदल किंवा रचना होण्यामागे अनेक शोध, अनेक कारणे ,तत्व, समाज प्रथा ,धर्म यांचा समावेश होता किंवा आहे ;त्याच प्रकारे आजच्या समाज रचनेत किंवा ज्याला आपण विज्ञान युग म्हणतो, कम्प्युटर युग म्हणतो त्यात जो बदल झाला तो केवळ आणि केवळ तंत्रज्ञानातील शोधामुळेच आज यालाच आपण डिजिटल तंत्रज्ञान असे म्हणतो आहे हा बदल केवळ मानवी समाजावर नाही झाला तर तो विवाह, नातेदारी त्याच बरोबर मैत्री, संस्कार ,संवाद देवाणघेवाण या जीवन रचनेवर सुद्धा झाला आहे; यामध्ये व्हाट्सअप, इंस्टाग्राम, ई-मेल इंटरनेट, यूट्यूब इत्यादी डिजिटल बाबींचा आपणास समावेश करावा लागेल.

**संशोधनाची गरज :**

'डिजिटल सोसायटी आणि रिलेशनशिप 'या विषयावर संशोधन करणे सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे वाटले; कारण मानवी समाज त्याची भावना त्यात असलेला भावनिक एकोपा, विश्वास, सामाजिक रूढी, परंपरा, मूल्य, नातेदारी यावर त्याचा या बाबींवर त्याचा परिणाम होत असतो. उद्दिष्टे :

1. डिजिटल सोसायटी ही संकल्पना समजून घेणे.
2. डिजिटल माध्यमांचा सामाजिक संबंध विवाह मैत्री कुटुंब यावर होणाऱ्या बदलांचा आढावा घेणे.
3. डिजिटल समाजाचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधनासाठी दुय्यम माहिती संकलन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. उदाहरणार्थ पुस्तके युट्युब जर्नल वर्तमानपत्र इत्यादी.

[1] आर बी अट्टल कॉलेज गेवराई, समाजशास्त्रीय विभाग

**विश्लेषण :**

डिजिटल संकल्पना समजावून अगोदर आपल्याला तिच्या काही व्याख्या आहे.' डिजिटल सोसायटी म्हणजे; अशी आधुनिक समाजव्यवस्था जिथे जीवन ,संवाद व रोजचे कामकाज आणि व्यवहार हे प्रमुख्याने विविध तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करावी लागतात; त्यास डिजिटल सोसायटी असे म्हणतात. उदाहरणार्थ इंटरनेट स्मार्टफोन कम्प्युटर इत्यादी ई बँकिंग वरील व्याख्यावरून आपणास असे म्हणता येईल की मनुष्य रोजच्या रोज सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत अनेक कामे मग ती कुठल्याही स्वरूपाची असो त्यात मनोरंजन आरोग्य विषयक शिक्षण विषयक माहिती विषयक तंत्रज्ञान विषयक वैद्यकीय ई-कॉमर्संबंधीचे सर्व व्यवहार ही डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातूनच चालवत असतो त्याचबरोबर आज प्रत्यक्ष सामाजिक कामाचा जर विचार केला संस्काराचा जर विचार केला तर विवाह जुळण्यासाठी सुद्धा ऑनलाईन सोयरी क ही पर्याप्त ठरत आहे .त्याच कारणाने मानवी जीवनाच्या प्रत्येक घटकावर आज डिजिटल तंत्रज्ञान उभा आहे मानवी संबंधावर खालील बाबीच्या संबंधातून डिजिटल तंत्रज्ञान आपली बाजू भक्कम करीत आहे ;

1. रोजचे बँक व्यवहार तो स्मार्ट नेटवर्कच्या माध्यमातून करत असतो .
2. शिक्षण क्षेत्रात सुद्धा आज डिजिटल शिक्षण पद्धतीने जागा घेतली आहे यात व्हाट्सअप, इमेल ,ऑनलाइन टिचिंग, व्हिडिओ टिचिंग, इत्यादीचा समावेश होतो .
3. विविध शासकीय काम ज्यात ऑनलाईन सातबारा काढणे, ऑनलाईन सर्टिफिकेट काढणे, विविध प्रकारची प्रमाणपत्र काढणे ,विथ ऑफिशियल मीटिंगा घेणे या सर्व बाबींची जागा आज डिजिटल सोसायटीने घेतलेली आहे.
4. वैद्यकीय क्षेत्र या सर्व क्षेत्रांबरोबरच आज आपण वैद्यकीय क्षेत्रात सर्वात मोठा परिणाम जर शोधत पाहत असू तर तो वैद्यकीय क्षेत्रात झाले आहे प्रत्येक मोठ्या दवाखान्यात हॉस्पिटलमध्ये डिजिटल एक्स-रे ऑनलाईन रिपोर्ट चेक करणे ,सोनोग्राफी इत्यादी सर्व कामे ही केली जातात आणि ती केवळ आणि केवळ डिजिटल तंत्रज्ञानामुळेच तर वैद्यकीय समाज सुद्धा डिजिटल समाजाला तंत्रज्ञानाला घेऊनच पुढे जात आहे असे म्हणूया 5. कुटुंबिक संबंध: जगाच्या पाठीवर राहणारे अनेक कुटुंब आहेत ते मोबाईल माध्यमातून आपले भावनिक नातेसंबंध जपत असतात .
5. विवाह व प्रेम संबंध आजच्या धकाधकीच्या जीवनात लग्न जुळवणे विवाह जुळवणे हा फारच दुर्मिळ योग बनत चालला आहे; परंतु ऑनलाईन फेसबुक ,व्हाट्सअप इत्यादी तंत्रज्ञानामुळे आज मनुष्य कुठल्याही जगातील व्यक्तीशी जवळकी निर्माण करू शकतो विवाह जुळू शकतो ते केवळ या डिजिटल तंत्रज्ञानामुळेच या समाजात शक्य झाला आहे

**मर्यादा :**

मनुष्य प्राण्याने कितीही मोठी प्रगती केली असली तरी त्यात काही ना काही त्रुटी असतात त्या त्रुटी खूपच घातक असतात वरील मानवी अनुषंगाने विचार केला तर त्यात खालील प्रकारच्या त्रुटी मर्यादा आपण ढोबळ अर्थाने सांगू शकतो.

1. डिजिटल तंत्रज्ञानामुळे सायबर क्राईम ही गुन्हेगारी संकल्पना आज ओळखा घालत आहे या डिजिटल तंत्रज्ञानाचे ते अपत्य आहे ;यात ऑनलाइन लॉटरी ,ओटीपी टाकून बँक फसवणूक त्याचबरोबर इतरही व्यवहारतून व्यवहारात अपघात झाल्याचे दिसून येत आहे.
2. शिक्षण क्षेत्रात सुद्धा डिजिटल तंत्रज्ञान मानवी भाषेतला ओलावा टाकत नाही परिणामी मुले एकल कोंडी बनवण्याची भीती सुद्धा आहे; असे आज तरी शैक्षणिक मानसशास्त्राच्या दृष्टीने ते एक महत्त्वाचे कारण आहे 3.वैद्यकीय सुविधांमध्ये जरी याचा वापर वाढला असला तरी तो रिस्की आहे कारण प्रत्येक पेशंट हा वेळ घेऊन हॉस्पिटलला जातो असे नाहीत त्यामुळे येथे सुद्धा त्याला मर्यादा येतच असतात.
3. कुटुंब जितके एकमेकांच्या सहवासात वेळ घालवतात तितके त्यांची जवळकी भावनिक नाते सुदृढ राहील परंतु ते व्हिडिओ कॉल च्या माध्यमातून किती वेळ पर्यंत टिकेल आणि ते किती खरे असेल ते सांगता येत नाही.
4. मनुष्य जीवनात अनेक महत्त्वाचे संस्कार आहेत पैकीच एक संस्कार म्हणजे विवाह संस्कार तो आज केवळ एक संस्कारात नावारूपाला आहे या माध्यमातून विवाह जुळला तरी सुद्धा तो टिकेल की नाही हे सांगता येत नाही कारण फेसबुक ,व्हाट्सअप किंवा ऑनलाइन माध्यमातून घेतलेला अनाभाका, सात फेऱ्या या टिकतीलच अशी शाश्वती नाही त्याला धर्म ,भाषा ,जात ,संस्कार इत्यादी बाबींचा अडथळा येत आहे .

**निष्कर्ष:**

या डिजिटल सोसायटीचा विचार केला तर त्याची जशी सकारात्मक परिणाम आहे तसेच नकारात्मक सुद्धा आहेत तारतम्य शोधून व्यक्तिने किंवा मनुष्य समाजाने संशोधित पद्धतीचा वापर करून निवडक गरजा शोधून त्यात डिजिटल तंत्रज्ञान वापरावे इतके तरी सध्या म्हणावे लागेल.

**संदर्भ:**

1. Antony aiddens -sociology
2. इंडियन जनरल ऑफ सोसिओलॉजी
3. https.gbs.edu.mt
4. https. //ask Filbert.com

**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*